॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. ८ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले व प्रज्ञासूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त दि. ११ ते १४ एप्रिल २०२६ या कालावधीत 'संयुक्त जयंती महोत्सवा'चे भव्य आयोजन करण्यात आले आहे. विद्यापीठ परिसरात सामाजिक समता, विचारप्रबोधन आणि बौद्धिक संवादाचा संगम घडवणारा हा महोत्सव ठरणार आहे.

या महोत्सवाचे आयोजन विद्यापीठातील विविध विचारधारा प्रशाळा, बौद्ध अध्ययन व संशोधन केंद्र, डॉ. आंबेडकर विचारधारा विभाग, महात्मा फुले अध्ययन व संशोधन केंद्र, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, तसेच मागासवर्गीय कर्मचारी संघटना आणि फुले शाहू आंबेडकर विचारमंच यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे.

या संयुक्त जयंती महोत्सवातंर्गत चार दिवस विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यात ११ एप्रिल रोजी 'क्रांती विचारांचे प्रज्ञाविचारातील संक्रमण आणि विद्यमान फलश्रृती' या प्रा. डॉ. संतोष सुरडकर यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच पोस्टर, चित्रकला, वक्तृत्व आणि काव्यवाचन अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. १२ एप्रिल रोजी 'सामाजिक ऐक्य आणि समतेचा संदेश' देण्यासाठी सकाळी ७ वाजता मुलांच्या वसतिगृहापासून प्रशासकीय इमारतीपर्यंत 'समता दौड', १३ एप्रिल रोजी रक्तदान आणि प्रबोधनपर कार्यक्रम तर १४ एप्रिल रोजी भव्य मिरवणूक आणि 'लोकशाही संस्कृतीची परंपरा, प्रवाह आणि विद्यमान वास्तव' या विषयावर सेवानिवृत सनदी अधिकारी उत्तम खोब्रागडे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.

विद्यापीठ प्रशासन व संयोजकांनी सर्व विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी तसेच नागरिकांनी या महोत्सवात उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन केले आहे.

..........................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: ८ एप्रिल, २०२६

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता